Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - VI JUNE 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# भारतातील शेतमजुरांची सद्यस्थिती आणि वाढत्या महागाईचा प्रश्न

प्रा.डॉ.एस.एस.देवनाळकर,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख तथा
संशोधन मार्गदर्शक,
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा
ता.निलंगा जि.लातूर

भारताची अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था आहे. आज सद्यःस्थितीत एकुण लोकसंख्येच्या ६४ टक्के लोकसंख्या शेती व शेतीशी संबंधीत व्यवसायात गुंतलेली आहे. ज्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत शेतमजुरांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. परंतू कृषी अर्थव्यवस्थेत महत्वाची भुमिका बजावणा-या शेतमजुराची स्थिती अत्यंत हलाखीची आणि दयनीय आहे. त्या सोबतच ती चिंताजनकसुध्दा आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेतील अतिशय मागासलेला शोषित आणि उपेक्षीत असणारा वर्ग म्हणजे शेतमजुर होय. विशेषतः भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेचा अर्थिक आणि सामाजिक जीवनाचा एक महत्वपूर्ण घटक म्हणून शेतमजूर या वर्गाकडे पाहिले जाते. कारण भारतातील शेतमजुरांचा प्रश्न हा कायमचाच संदिग्ध म्हणून राहिला आहे. आज भारताच्या अर्थव्यवस्थेतील अनेक प्रश्नांमधून शेतमजूर हा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. भारतात शेतमजुराच्या समोर एक ज्वलंत समस्या उग्ररुप धारण करीत आहे ती म्हणजे वाढती महागाईची समस्या. भारतात सध्याच्या महागाईमुळे कांही गोरगरीब, मजूर एका वेळचे अन्नदेखील खाऊ शकत नाही. महागाईच्या आलेख सतत वरवरच चढत जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागात कित्येक जीवनावश्यक गोष्टीही आज दैनंदिन जीवनातून भागत नाहीत.

खरे पाहता, स्वातंत्र्योत्तर काळात आपण कृषी आणि उद्योग या दोन्ही क्षेत्रात प्रचंड प्रगती केली होती. परंतू सध्या शेतीची अवस्था, महापुरासारख्या परिस्थितीसारखी झाल्यामुळे पिकांची नासाडी होत आहे. यामुळे शेतातून योग्य असा माल मिळत नाही. यामुळे बाजारपेठेत माल कमी येतो. तसेच सरकारकडून मालाला योग्य भाव मिळकत नाही. यामुळे शेतकरी आत्महत्येकडे वळतात व या परिस्थितीतून महागाई वाढवण्यास सहजरित्या अनेक विविध पर्याय उपलब्ध होतात. प्रस्तूत शोध निबंधात भारतातील शेतमजुराची सद्यःस्थितीचा अभ्यास केलेला आहे. आणि वाढत्या महागाईमुळे भारतीय शेतकरी वर्ग व शेतमजुराच्या विपरीत परिस्थितीविषयी प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधन लेखाची उद्दिष्टये :**

भारतातील शेतमजुरांची सद्यस्थिती आणि वाढत्या महागाईचा प्रश्न या संशोधन लेखाची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे आहेत-

१) भारतातील शेतमजुरांच्या आर्थिक परिस्थितीवर प्रकाश टाकणे.
२) भारतातील शेती क्षेत्राच्या सद्यस्थिती विषयी माहिती जाणुन घेणे.
३) भारतीय शेतमजुरांचे भवितव्य वाढत्या महागाईमुळे कसे त्रस्त झाले आहे याचा आढावा घेणे.
४) भारतातील महागाईच्या प्रश्नाचा अभ्यास करणे.
५) महागाई कमी करण्यासाठी कांही धोरणात्मक उपाय सुचविणे.

**भारतीय शेती क्षेत्राची सद्यःस्थिती :**

भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राला अनन्यसाधारण असे महत्व दिले जाते. राष्ट्रीय उत्पन्न, अंतरराष्ट्रीय व्यापार, रोजगार औद्योगीक आणि इतर क्षेत्रांचा विकास तसेच उपभोगाचे प्रमुख साधन अशा अनेक बाबतीत शेती व्यवसायाचा भारतीय अर्थव्यवस्थेत सिंहाचा वाटा आहे. राष्ट्रीय उत्पादनांत कृषी क्षेत्राचा वाटा १९५०-५१ मध्ये ५६.६४ टक्के होता. यावरुन भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे महत्व लक्षात येते. परंतू कालांतराने भारताने उद्योग व सेवा क्षेत्रात केलेल्या वृध्दीने हा हिस्सा कमी कमी होत गेला असून २००८-०९ मध्ये राष्ट्रीय उत्पादनांत कृषी, क्षेत्राचा वाटा ५६.३५ टक्के औद्योगिक क्षेत्राचा वाटा २५.६१ टक्के आणि सेवा क्षेत्राचा वाटा १८.०४ टक्के आहे. यावरुन असे

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - VI JUNE 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

लक्षांत येते की, कृषी क्षेत्राचा वाटा घटत आहे. विकासाच्या क्षमता कृषी क्षेत्रात नाहीत असे वाटत असले तरी १९५०-५१ मध्ये शेतीतून राष्ट्रीय उत्पन्न ८३१५० कोटी रुपयाचे होते तर २००६-०७ मध्ये ५८८५३० कोटी रुपये नी वाढले. यावरुन असे म्हणता येईल की राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचे उत्पन्न वाढत आहे. पण या वाढलेल्या उत्पन्नाला महागाईमुळे गृहन लागले आहे.

**भारतातील शेतमजुराचे भवितव्य व वाढत्या महागाईची समस्या :**

भारताच्या ग्रामीण भागात शेतीवर अवलंबुन असणा-याचे प्रमाण ७० टक्के आहे. शेतीवर अवलंबुन असणारा शेतमजुरांचा गट शेतीत काम करतो. मजुरी मिळविण्याच्या उद्येशाने ग्रामीण भारतातील मुख्य व्यवसाय शेती असल्याने प्रत्यक्ष शेतीवर काम करणा-या व दुस-यांच्या शेतीवर काम करणा-यांची संख्या मोठी आहे. शेतीसाठी आपले श्रम व ज्ञान पैशासाठी पुरवणा-यांनाच शेतमजूर म्हणतात. वाढत्या महागाईमुळे शेतमजुर अन्न वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण या मुलभूत गरजाही पूर्ण करु शकत नाहीत. शेतमजुर काम करताना आपल्यासोबत मुलाबाळांनाही कामावर नेतात. शेतमजुरांमध्ये स्त्री मजुरांचीही संख्या मोठया प्रमाणांत वाढत आहे. महिला व शेतमजुराचे अर्थिक, लैंगिक शोषण होते. स्त्री मजुरांना पुरुष मजुरांपेक्षा कमी मजुरी दिली जाते. बांधील शेतमजुर, स्वतःची जमीन नसणारा भुमीहीन शेतमजुर अल्प भूधारक व अत्यल्प भूधारक असे शेतमजुरांचे प्रकार पडतात. भारतातील शेतमजुरांची संख्या, त्यांना मिळणारे वेतन, त्यांचे रहाणीमान याविषयी अचूक माहती उपलब्ध असतेच असे नाही.

भारतात शेतमजुराची परिस्थिती आज सद्यःस्थितीत खूपच दयनिय झाली आहे. याला कारण म्हणजे मोठ्या प्रमाणांत वाढत जाणारी महागाई होय. महागाईचा प्रश्न देशातील सर्वसामान्य अवस्थेत जीवन जगणा-या लोकासमोर तर जास्तच प्रमाणांत भेडसावत आहे. बाजारात मिळणारी प्रत्येक गोष्ट महाग झालेली आहे. आणि त्याची कारणे पण जागतिक ,राष्ट्रीय किंवा प्रादेशीक असतात असे म्हटले जाते. त्यावर आपला कांहीच कंट्रोल नाही. विदर्भातले शेतकरी नेहमीच आत्महत्या करतात. त्याची आता मिडीयाला सवय झालेली आहे की, त्याचे बातमी मुल्य शुन्य झाले आहे. आजपर्यंत आणि पेपरमध्ये त्याचा साधा आलेख पण नसतो. केवळ खेडयातल्या शेतक-यामध्ये असलेला हा आत्महत्या करण्याचा मानसिक रोग हल्ली शहरातल्या लोकांमध्येही पसरला आहे. आयुष्याला कंटाळून आत्महत्या करण्याचे प्रमाण खूप वाढले आहे. यांचे कारण म्हणजे फक्त महागाई आणि महागाईच !

**भारतातील महागाईचे स्वरुप :**

भारतातील महागाई भयानक अवस्थेपर्यंत पोहंचली आहे. अन्नधान्याच्या किंमती अतिउच्च शिखरापर्यंत गेल्या आहे. अन्नाच्या महागाईचा दर सातत्याने वीस टक्याच्या वर राहिला. लोकांचे उत्पन्न व मिळकत ज्या वेगाने जात आहे त्या मानाने अन्नधान्याचे उत्पन्न मागे पडले. कृषी क्षेत्रातील उत्पादकता व त्याची वृध्दी उद्योग क्षेत्राच्या तुलनेने खूप कमी आहे. त्याचे एक कारण म्हणजे कृषी क्षेत्रात सरकारी व खाजगी गुंतवणूकीचे प्रमाण नगण्य आहे. पाटबंधारे, ग्रामीण रस्ते, वीज संकरीत बियाणे, कृषी विद्यापीठे या सर्वांना भरपूर भांडवल गुंतवणूकीची गरज आहे. आणि पैसा हा सरकारी तिजोरीतून येत असतो. मात्र ब-याच राज्यांमध्ये सरकारी तिजो-या रिकाम्या आहेत. कृषी क्षेत्रातील इतर आवश्यक अर्थिक सुधार म्हणजे मंडईच्या खरेदीमधील एकाधिकार संपविणे, शेतजमिनींच्या विविध तुकडयांचे एकत्रीकरण व शेतमालाच्या किंमतीत व शहरी ग्राहकांनी मोजलेल्या किंमतीतील तफावत कमी करणे.

भारतातील महागाईचा प्रश्न दिवसंदिवस सर्वसामान्य शेतक-यांना, शेतमजुरांना भेडसावत आहे. महागाई वाढलेली असतानाच गेल्या तीन वर्षात मात्र भारतीयांच्या उत्पन्नात सरासरी १२ ते १५ टक्के इतकीच वाढ झाली आहे. महागाई संदर्भात क्रिसिलने केलेल्या सर्वेक्षणानुसार अनेक धक्कादायक गोष्टी पुढे आल्या आहेत. यानुसार जीवनावश्यक वस्तू किंवा स्वयंपाक घराच्या अविभाज्य भाग म्हणाव्यात अशा तब्बल ३१६ वस्तूंच्या किंमतीत किमान दुप्पटीने आणि कमाल पाचपटीने वाढ झाली आहे. तांदूळ, गहू, डाळ, चहा, साखर, कांदा, बटाटा, तेल, मोहरी, तीखट, हळद, हिंग, जिरे यांच्या किंमती २००८ च्या तुलनेत तिपटीने जास्त वाढल्या आहेत. भाज्या,फळे, किंवा मांसाहारांच्याही सुमारे २४ वस्तुंच्या किंमतीत प्रचंड वाढ झाली आहे. भेंडी, गवार, दुधी, पडवळ या भाज्यांच्य पांच अथवा अर्धा किलोचा भाव तीन वर्षापुर्वी १० रुपयांच्या आत होता. या भाज्या आता १५ ते २० रुपये इतक्या भावाने पाव किलो वजनाने मिळत आहेत.

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - VI JUNE 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

**सद्यःस्थितीत महागाईचा दर :**

भारतीय अर्थव्यवस्थेत महागाई किंवा भाववाढीचा दर दिवसेंदिवस वाढत आहे. सामान्य जनतेच्या संकटात महागाईमुळे भर पडत आहे. सामान्य जनतेच्या संकटात दिवसंदिवस वाढच होत आहे. ऑगस्ट २०१२ मध्ये महागाई दरात वाढ झाली आहे. जो महागाई दर जुलै २०१२ मध्ये ६.८७ एवढा होता. हाच महागाई दर ऑगस्ट २०१२ मध्ये ७.५५ एवढा झाला आहे. महागाईचा परिणाम बाजारातील तेजीवर दिसत नाही. बटाटे, गहू आणि डाळ-धान्य यासारख्या जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढल्याने यावर्षी ऑगस्ट महिन्यात पुन्हा एकदा महागाई दरात वाढ झाली आहे.

महागाईच्या वाढत्या भावामुळे भारतीय रिजर्व्ह बँकेच्या २०१२ मध्ये जाहीर होणा-या पतधोरणांत व्याजदरात कपात होण्याची शक्यता फारच कमी आहे. घाऊक किंमतीवर आधारीत महागाई दर हा जुलै २०१२ मध्ये ६.८७ होता. तर मागच्या वर्षी ऑगस्ट महिन्यात हाच महागाई दर ९.८७ एवढा होता. अन्नधान्याच्या महागाईचा दर जुलैच्या तुलनेंत ऑगष्ट मध्ये कमी होऊन ९.१४ टक्के राहिला आहे. जुलैमध्ये हा दर १०.०६ टक्के होता. घाऊक किंमतीवर आधारलेल्या सुचांकानुसार खाद्य उत्पादनांचे योगदान १४.३ टक्के आहे. उत्पादन वस्तुंच्या किंमती जुलै २०१२ मध्ये ५.५८ टक्यांच्या तुलनेत ऑगस्ट २०१२ मध्ये ६.१४ टक्यांनी वाढल्या आहेत. उत्पादन गटात सूती वस्त्र, कागद आणि कागदाची उत्पादने, सिमेंट, चुनखडी याच्या किंमतीत वाढ झाली आहे.

वार्षिक खाद्य उत्पादन वर्गानुसार, डाळींचे ऑगस्ट २०१२ मध्ये भाव ३४.३९ एवढे वाढीव होते. ह्याच दरम्यान गव्हाची किंमत १२.८५ टक्याने तर इतर धान्ययाची किंमत १०.७१ टक्के एवढी वाढली. ह्याशिवाय बटाटा ६८.६८ टक्याने तर मागच्या वर्षीपेक्षा तांदूळ १०.२० टक्याने महागला आहे. अंडी, मांस मच्छीच्या किंमतीत वार्षिक दराच्या आधारावर १३.७७ टक्के एवढी झाली आहे. तर दुध आणि फळांच्या किंमतीत अनुक्रमे ६.६८ टक्के आणि १.१४ टक्के एवढी वाढ झाली आहे. खाद्येतर उत्पादन म्हणजेच तेलबियांच्या किंमतीत २८.३३ टक्के आणि खनिज वार्षिक स्तरावर ९.७४ टक्यांनी महागली आहेत.

**महागाई रोखण्यासाठी उपाय :**

महागाई वाढल्यामुळे समाजाचे अर्थिक, सामाजिक आणि राजकीय जीवन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे महागाई अर्थव्यवस्थेला जडलेला एक रोग आहे. तेंव्हा हा रोग बरा करण्यासाठी कांही उपाययोजना पुढीलप्रमाणे सुचविल्या आहेत.

१) धान्य पुरवठा वाढविण्यासाठी वाढत्या प्रमाणांवर आयात करावी, जीवनावश्यक वस्तूविषयक कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्यात यावी तसेच किमान किंमत निश्चीत करण्यात यावी.

२) औद्यौगिक क्षेत्रात उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने विविध उद्योगाची उत्पादन क्षमता वाढविण्यात यावी.

३) खर्च कमी करण्यासाठी व बचत वाढावी म्हणून विविध कर उपाय योजनण्यात यावे. उत्पन्न करात सवलत देण्यात यावे. तसेच तुटीचा अर्थभरण्याचे प्रमाण कमी करण्यात यावे. बँक रेट वाढवण्यात यावा. गुणात्मक पथनियंत्रणाचा वापर करुन त्याचा नैतिक पाठपुरावा करण्यात यावा.

४) वेळोवेळी वाढत्या महागाईला आळा घालण्याच्या उद्देशाने सरकारने अनेक वस्तुसाठी कमाल व किमान किंमत निश्चीत करावी.

५) विविध मार्गाने भारत सरकारने लोकसंख्या नियंत्रीत करुन महागाई थांबवण्याचा प्रयत्न करावा.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत संशोधन लेखावरील निष्कर्ष पुढीलप्रमाणे काढण्यात आलेले आहेत.

१) भारतातील शेतमजुरांचा अर्थिक परिस्थितीत सुधारणा न होण्याचे कारण म्हणजे वाढत्या महागाईचा प्रश्न होय. वाढत्या महागाईमुळे शेतमजुरी करणा-या व्यक्तिला जीवन जगणे कठीण झाले आहे.

२) भारतासारख्या विकसनशील देशात आवश्यक वस्तुचे भाव वढविणे उत्पादकांच्या हातात नसते, सरकारचाही हातात नसते, संबंधीत खरेदीदाराचा सरकारवार किती प्रभाव आहे यावर महागाईचा दर ठरत असतो.

३) गेल्या ३५ वर्षात महागाई कमी करण्यासाठी शास्त्रीय, विवेकी, व्यवहारीक किमती बाबतचे धोरण सरकार अमलात आणु शकले नाही फक्त वेळोवेळी किंमत नियंत्रणे, सरकारी ग्राहक भांडाराची स्थापना, थोडयाफार प्रमाणांत साठेबाज, नफाखोर काळा बाजार वाल्याविरुद्ध कायदेशिर कार्यवाही अशा

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - VI JUNE 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

प्रकारचे तात्पुरते उपाय अंमलात आणले तरी त्याचा परिणाम भारतीय शेतमजुरावर अनुकुल परिणाम तेवढा जाणवला नाही.

४) भारतातील महागाईचा प्रश्न मोठया प्रमाणांत वाढत असल्यामुळे सर्वसामान्य वस्तुंच्या बाबतीतही शेतमजुरांना त्या वस्तु खरेदी करता येत नाहीत.

५) भारतीय अर्थव्यवस्थेत वाढत्या महागाईच्या प्रश्नामुळे शेतमजुरावर प्रतिकुल कट कोसळले आहे. याबाबत केंद्र व राज्य सरकारने यावर त्वरीत उपाय सुचवून त्याची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

**संदर्भग्रंथ :-**

१) प्रा.अशोक बोरीकर-भारतीय नियोजन-पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपुर.
२) प्रा.ए.आर.रायखेळकर, डॉ. बी.ए.दामजी-मुद्रा अधिकोषन आणि सार्वजनिक वित्त-विद्याबुक पब्लिशर्स,औरंगाबाद.
३) रुद्रदत्त व सुंदरम-भारतीय अर्थव्यवस्था, एस चंद पब्लिशर्स, दिल्ली (२००९-१०)
४) रंजर कोळंबे-भारतीय अर्थव्यवस्था -भगीरथ प्रकाशन पुणे (२०१०)
५) डॉ. वसुधा पुरोहीत-भारतीय अर्थव्यवस्था-विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.
६) डॉ. श्री.आ.देशपांडे-अधिकोषण आणि नाणेबाजार-विद्या प्रकाशन नागपूर
७) प्रतियोगीता दर्पण-भारतीय अर्थव्यवस्था विशेषांक (२०१०-११)